(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

[१९६१] १ एस. सी. आर. ९४३

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार

वि.

मुंबई राज्य आणि अन्य एक

(संबंधित अपीलांसह )

(बी. पी. सिन्हा, सरन्यायाधीश, जे. एल. कपूर, पी. बी. गजेंद्रगडकर, के. सुब्बा राव आणि के. एन. वांचू, न्या. न्या.)

इनाम — वैयक्तिक इनामांचा निरास - कायद्याची घटनात्मक वैधता - "संपदा" "संपदेतील हक्क", चा अर्थ - मुंबई वैयक्तिक इनाम निरास अधिनियम, १९५२ (मुंबई सन १९५३ चा क्र. ४२), कलम ४, ५, ७, १७—मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ (मुंबई सन १८७९ चा क्र. ५), कलम ३(५) - भारतीय राज्यघटना, अनुच्छेद ३१, ३१-क.

अपीलकर्ते हे मुंबई अधिनियम क्र. २ आणि ७/१८६३ नुसार विनियमन होणारे वैयक्तिक इनाम धारण करीत होते, ज्यानुसार त्यांनी पूर्ण निर्धारणापेक्षा कमी असलेला

जमीन महसूल भरून त्यांच्या जमिनी धारण केल्या होत्या. मुंबई वैयक्तिक इनाम निरास अधिनियम, १९५२ अंमलात आल्यानंतर, बाधित होणाऱ्या अपीलकर्त्यांनी या कायद्याच्या वैधतेला इतर गोष्टींबरोबरच पुढील कारणांवरून आव्हान दिले, (१) असे की, पूर्ण निर्धारण आणि उक्ते भाडे यातील तफावतीचा स्वत:साठी विनियोजन करण्याचा इनामदाराचा अधिकार कलम ४ आणि ५ नष्ट करते आणि ही राज्यघटनेच्या अनुच्छेद ३१-क च्या अर्थांतर्गत संपदा नाही, आणि (२) असे की, भारतीय राज्यघटनेच्या कलम ३१-अ, आणि ('२) अपीलकर्त्यांची मालमत्ता हिरावून घेण्याबद्दल अधिनियमात नुकसानभरपाईची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

असा निर्णय देण्यात आला की, (१) पूर्ण मूल्यांकन आणि उक्ते भाडे यांतील फरकाचे इनामदाराने स्वतःसाठी विनियोजन करण्याचा त्याचा अधिकार हा जमीन-महसुलाच्या संदर्भातील अधिकार होता आणि म्हणून तो अनुच्छेद ३१-क (२) (ख) च्या व्याख्येनुसार संपदेमधील हक्क होता. असा हक्क मुंबई जमीन महासून संहिता १८७९ च्या कलम ३(५) च्या कक्षेत सुद्धा येतो आणि अशा प्रकारे, तो अनुच्छेद ३१-क अन्वये संपदा होता. त्यानुसार, कायदयाद्वारे जेव्हा इनामदारांचे इनाम संपदेमधील अधिकार संपुष्टात आले किंवा त्यात बदल करण्यात आले, तेव्हा तो अनुच्छेद ३१ द्वारे स्पष्टपणे संरक्षित होता.

(२) असे की, अधिनियमाच्या कलम १७ चे पोट-कलम (५), ज्याद्वारे उक्ते भाडे आणि पूर्ण मूल्यांकन यांतील फरकामुळे इनामदारास जे मिळत असे, त्याच्या

नुकसानीबद्दल त्याला कलम १७ च्या पोट-कलम (५) नुसार कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नव्हती, ते अवैध नव्हते कारण अनुच्छेद ३१-क हे अनुच्छेद ३१, जे नुकसानभरपाईबाबत तरतूद केलेले एकमेव अनुच्छेद आहे, त्याच्या कोणत्याही हल्ल्यापासून अधिनियमाचा बचाव करते.

दिवाणी अपीलिय अधिकारिता : दिवाणी अपीले क्र. १५५ ते १६०/१९५६.

विशेष दिवाणी अर्ज क्र. ३९३, ३९५, ४०९ अणि ३२/१९५४ मधील दिनांक ६ जुलै, १९५४ रोजीच्या ; विशेष दिवाणी अर्ज क्र. १२०५/१९५४ मधील दिनांक १९ जुलै, १९५४ रोजीच्या ; आणि विशेष दिवाणी अर्ज क्र. १३०९/१९५४ मधील दिनांक ३० जुलै, १९५४ रोजीच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय आणि आदेशांवरून अपीले.

पुरुषोत्तम त्रिकमदास, व्ही. एम. लिमये, ई. उदयरत्नम आणि एस. एस. शुक्, अपीलकर्त्यांसाठी

एच. एन. सन्याल, भारताचे अतिरिक्त महा न्याय अभिकर्ता, एन. पी. नाथवानी, के. एल. हाथी आणि आर. एच. ढेबर, उत्तरवादीसाठी.

३ ऑक्टोबर, १९६०. न्यायालयाचा न्यायनिर्णय वांचू, न्या. यांनी दिला -

मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या प्रमाणपत्रावरील ही सहा अपीले बॉम्बे वैयक्तिक इनाम निरास अधिनियम क्र. ४२/१९५३ (यापुढे अधिनियम असे संबोधण्यात आले आहे) च्या घटनात्मकतेविषयी सर्वसामान्य प्रश्न उपस्थित करतात आणि या न्यायनिर्णयाद्वारे तो निकाली काढण्यात येईल. अपीलकर्ते बॉम्बे अधिनियम क्र, २ आणि

७/१८६३ मध्ये अंतर्भूत असणारे वैयक्तिक इनाम धारण करतात. उच्च न्यायालयात या कायद्यावरून अनेक कारणांवरून आव्हान देण्यात आले होते, ज्यापैकी केवळ दोन आमच्यासमोर मांडण्यात आली, ती म्हणजे, (१) अधिनियमांतर्गत जी मालमत्ता विचारात घेण्यात आली आहे ती संपदा नाही आणि (२) अपीलकर्त्यांची मालमत्ता हिरावून घेण्याबद्दल अधिनियमात नुकसानभरपाईची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. या रिट याचिकांना मुंबई राज्याने विरोध केला होता आणि त्याच्या वतीने मुख्य युक्तिवाद असा होता की, हा अधिनियम राज्यघटनेच्या अनुच्छेद कलम ३१-क अंतर्गत संरक्षित आहे.

आमच्यासमोर उपस्थित केलेल्या दोन मुद्द्यांवर चर्चा करण्यापूर्वी, आम्ही बॉम्बे अधिनियम क्र. २ आणि/१८६३ अन्वये वैयक्तिक इनामधारकांना असलेल्या अधिकारांचा उल्लेख करू इच्छितो. अधिनियम क्र. ११ मुंबई इलाख्याच्या काही भागांपर्यंत विस्तारीत करण्यात आला आणि त्या भागांतील शासकीय जमीन-महसुलाच्या प्रदानापासून पूर्णपणे किंवा अंशतः सूट असलेल्या जमिनी धारण करीत असलेल्या जमीनधारकांशी संबंधित होता. ज्यांच्या सुटीच्या हक्काबाबत तोपर्यंत औपचारिक निर्णय झाला नव्हता, अशा जमीनधारकांच्या प्रकरणांची तरतूद अधिनियमात करण्यात आली होती. त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, अशा भूधारकांनी, त्यांनी उपभोगलेल्या सवलतीसाठी आपले हक्क सिद्ध करण्यास भाग पाडण्याच्या अग्रक्रमाऐवजी कायद्यात विहित केलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्यास संमती दिल्यास, प्रांतीय सरकार

संबंधित धारकांना, त्यांच्या वारसांना आणि अभिहस्तांकितींना अशा अटींवर आणि सदर अटींच्या अधीन राहून त्या जमिनीची कायमस्वरूपी मालकी अखेरीस अधिकृत करण्यास आणि सलगतेची हमी देण्यास तयार असेल. या संदर्भातील कायद्यातील मुख्य तरतुद अशी होती की, (१) उत्तराधिकार आणि हस्तांतरणाच्या संदर्भात सर्वाधिक रकमेच्या सर्व दाव्यांच्या अनुषंगाने नजराणा म्हणून ठराविक वार्षिक प्रदान, ज्याची गणना निर्धारणाच्या प्रत्येक रुपयासाठी एक आणा या दराने केली जाईल, ते करण्याच्या अधीन राहून आणि (२) निर्धारणाच्या एक चतुर्थांश इतके उक्ते-भाडे देण्याच्या अधीन राहून, अशा जमीनधारकांना त्यांच्या जमिनी कायमस्वरूपी ठेवण्याचा अधिकार असेल. ज्या प्रकरणांमध्ये अशा जमिनीचे धारक कायद्याच्या अटींचे पालन करण्यास तयार नव्हते आणि त्यांचे दावे अभिनिर्णीत होण्याची त्यांची इच्छा होती अशा प्रकरणांसाठी कायद्यात इतर तरतुदी होत्या ; परंतु सध्याच्या कारणांसाठी आमचा त्या तरतुदींशी संबंध नाही. अशा प्रकारे जमीन धारकांना अधिनियम २ द्वारे मिळालेला मुख्य अधिकार हा होता की, त्यांनी पूर्ण निर्धारणाऐवजी निर्धारणाच्या एक चतुर्थांशाचे अधिक निर्धारणाच्या पुढील एक सोळांश प्रदान करून त्यांच्या जमिनी धारण केल्या ; अशा प्रकारे त्यांनी पूर्ण निर्धारणाच्या रुपयातील पूर्ण पाच आणे भरले आणि रुपयातील अकरा आणे स्वतःसाठी राखून ठेवले.

अधिनियम क्रमांक ७ हा बॉम्बे प्रांताच्या उर्वरित भागांमध्ये जमिनी धारण करणाऱ्या अशाच धारकांशी संबंधित होता आणि त्यात अशाच प्रकारच्या तरतुदी होत्या,

फक्त त्यात असा फरक होता की, अशा जमीनधारकांना कलम ६ अन्वये निर्धारणाच्या प्रत्येक रुपयासाठी दोन आणे उक्ते भाडे द्यावे लागेल. अशा प्रकारे, जे अधिनियम ७ च्या कक्षेत आले त्यांनी निर्धारणाच्या रुपयातील केवळ दोन आणे भरले आणि रुपयातील चौदा आणे स्वतःसाठी राखून ठेवले.

आता आपण कायद्यातील तरतुदींकडे वळू. कलम २ (क) नुसार 'इनामदार' या शब्दाची व्याख्या वैयक्तिक इनामधारक अशी करण्यात आली आहे आणि त्यामध्ये त्याने किंवा त्याच्यामार्फत कायदेशीररित्या धारण केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे. कलम २ (डी) मध्ये "इनाम गाव " किंवा "इनाम जमीन" यांची व्याख्या करण्यात आली आहे, तर कलम २ (ई) मध्ये "वैयक्तिक इनाम" ची व्याख्या करण्यात आली आहे. कलम ३ मध्ये अशी तरतूद आहे की, देवस्थान इनाम किंवा धार्मिक अथवा धर्मादाय संस्थांनी धारण केलेल्या इनामांसह काही विशिष्ट इनामांना सदर कायदा लागू होणार नाही. सदर कलमाच्या स्पष्टीकरणामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, 'धार्मिक किंवा धर्मादाय संस्थांकडे असलेले इनाम' या संज्ञेचा अर्थ सत्ताधारी प्राधिकरणाने धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठी तात्पुरते मंजूर केलेले किंवा मान्यता दिलेले देवस्थान किंवा धर्मादाय इनाम असेल आणि मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ (यापुढे संहिता असे संबोधण्यात आले आहे) च्या कलम ५३ अन्वये ठेवलेल्या अन्यसंक्रामण नोंदवहीमध्ये किंवा निवृत्ती वेतन अधिनियम, १८७१ अन्वये केलेल्या नियमांतर्गत ठेवलेल्या अभिलेखामध्ये अशा नोंदी नोंदविल्या जातील. अशा प्रकारे जेथे

धार्मिक किंवा धर्मादाय संस्थांचा संबंध आहे, तेथे त्यांनी सुरुवातीपासून धारण केलेली देवस्थान किंवा धर्मादाय इनामे आणि संबंधित अभिलेखामध्ये नोंदविण्यात आलेली इनामे कायद्याच्या तरतुदींच्या बाहेर होती. कलम ४ मध्ये सर्व वैयक्तिक इनामे नष्ट केली आहेत आणि कायद्यामध्ये किंवा कायद्यातील तरतुदींमध्ये स्पष्टपणे तरतूद केल्याव्यतिरिक्त, अशा वैयक्तिक इनामांच्या संदर्भात सदर दिनांकास कायदेशीररित्या अस्तित्वात असलेले सर्व अधिकारसुद्धा, काही अपवाद वगळता, जे आता महत्वाचे नाहीत, ते रद्द करण्यात आले. कलम ५ मध्ये अशी तरतूद आहे की, सर्व इनाम गावे किंवा इनाम जमिनी संहितेच्या तरतुदींनुसार किंवा त्या अंतर्गत केलेल्या नियमांनुसार जमीन महसूल देण्यास जबाबदार आहेत आणि असतील आणि संहितेच्या तरतुदी आणि सरकारी जमिनीशी संबंधित नियम अशा जमिनींना लागू असतील. त्यात पुढे अशी तरतूद आहे की, इनामदाराच्या किंवा कनिष्ठ धारकाव्यतिरिक्त (आम्ही आताच जे नमूद करू त्या अपवादाच्या अधीन राहून) त्याच्याकडून धारण करणाऱ्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या इनाम जमिनीच्या संदर्भात इनामदार त्याने धारण केलेल्या अशा जमिनीच्या संदर्भात देय असलेल्या जमीन-महसुलाच्या प्रदानासाठी राज्य शासनास प्रामुख्याने जबाबदार असेल आणि सर्व अधिकारांना हक्कदार असेल आणि संहिता किंवा त्याअंतर्गत केलेले नियम किंवा सध्या लागू असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये कब्जेदार म्हणून अशा जमिनीच्या संदर्भातील सर्व जबाबदाऱ्यांना उत्तरदायी असेल. अशा प्रकारे, कलम ५ नुसार वैयक्तिक इनामधारक संपूर्ण जमीन-महसूल

देण्यासाठी सर्व व्यावहारिक कारणांसाठी कब्जेदार बनला आणि सन १८६३ च्या अधिनियम २ आणि ७ अन्वये त्याला जमीन-महसुलाचा केवळ एक भाग भरण्याचा आणि उर्वरित भाग स्वतःसाठी राखून ठेवण्याचा जो फायदा होता, तो काढून घेण्यात आला. आम्ही वर उल्लेख केलेला अपवाद असा होता की, जेथे इनाम जमीन धारण करणाऱ्या कनिष्ठ धारकाने वैयक्तिक इनामधारकाला वार्षिक निर्धारणाएवढी रक्कम दिली, तेथे असा कनिष्ठ धारक राज्य सरकारला उत्तरदायी असेल आणि संहितेनुसार तो जमिनीचा कब्जेदार होईल. त्यानंतर कलम ७ मध्ये सार्वजनिक रस्ते, पथ व गल्ल्या, पूल, खंदक , बंधारे व कुंपणे, समुद्र पात्र व बंदरे, उंच जलचिन्हा खालील खाडया आणि नद्या, ओढे, नाले, तलाव, विहिरी व टाक्या आणि सर्व कालवे, जलप्रवाह, सर्व स्थिर आणि प्रवाही पाणी, सर्व न बांधलेल्या गावांची जागा, सर्व पडीक जमिनी व सर्व विनालागवडीच्या जमिनी (बांधकामासाठी किंवा इतर अकृषिक कारणांसाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनी वगळून) राज्य शासनास निहित करण्यात येतात आणि त्यातील इनामदारांचे हक्क संपुष्टात आणतात. कलम ८ मध्ये झाडांचे हक्क आणि कलम ९ मध्ये खाणी आणि खनिज उत्पादने नमूद करण्यात आली आहेत. कलम १० मध्ये कलम ७ अन्वये हक्क नष्ट केल्याबद्दल नुकसान भरपाईची तरतूद आहे, तर कलम ११ नुसार कलम १० खालील जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावर अपील करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कलम १२ ते १६ प्रक्रियात्मक बाबींशी निगडित आहेत आणि कलम १७ मध्ये, कलम १० मध्ये समाविष्ट नसलेल्या इनामदाराच्या अधिकारात विलोप किंवा सुधारणा

करण्यासाठी नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे. परंतु, कलम १७ च्या पोट-कलम (५) मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "या कलमातील कोणत्याही बाबीमुळे कोणतीही व्यक्ती या कारणास्तव नुकसान भरपाईस पात्र ठरणार नाही की, कोणतेही इनाम गाव किंवा इनाम जमीन, जिला जमीन-महसूल भरण्यापासून पूर्णपणे किंवा अंशतः सूट देण्यात आली होती, ती या कायद्यातील तरतुदींन्वये, संहितेच्या तरतुदींच्या अनुषंगाने पूर्ण कर निर्धारणाची रक्कम भरण्याच्या अधीन आहे." कलम १७ मध्ये बंधपत्रे जारी करण्याची तरतूद आहे तर कलम १८ मध्ये कोणत्याही इनाम गावास किंवा इनाम जमिनीस किंवा इनामदार आणि त्याच्या कुळांच्या परस्परांतील अधिकार आणि जबाबदाऱ्या यांना मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ लागू करण्याची तरतूद आहे. कलम १९ मध्ये नियम बनवण्याची तरतूद आहे आणि कलम २० हे निरसन आणि दुरुस्तीशी संबंधित आहे.

कायद्याच्या या विश्लेषणावरून हे दिसून येईल की, मुख्य तरतुदी या कलम ४, ५ आणि ७ आहेत. जेथे कलम ७ चा संबंध आहे, तेथे त्या कलमानुसार राज्याला निहित करण्यात आलेल्या जमिनीच्या संदर्भात नुकसान भरपाईची तरतूद आहे.. परंतु कलम ४ व ५ द्वारे नष्ट करण्यात आलेल्या अधिकारांसाठी कोणत्याही भरपाईची तरतूद करण्यात आलेली नाही. जसे आपण आधीच पाहिले त्याप्रमाणे इनामदाराचा मुख्य अधिकार हा जमीन महसूल, जो पूर्ण निर्धारणापेक्षा कमी होता, तो दिल्यावर त्याची जमीन धारण करणे हा होता आणि हाच अधिकार कलम ४ आणि ५ द्वारे रद्द करण्यात आला आहे

आणि आता इनामदाराला पूर्ण निर्धारण द्यावे लागेल. पूर्ण निर्धारण भरल्यामुळे इनामदारास होणाऱ्या नुकसानीसाठी कोणत्याही भरपाईची तरतूद करण्यात आलेली नाही.

यावरून आपण पहिल्या युक्तिवादाकडे येतो. अपीलकर्त्याच्या वतीने असा आग्रह धरण्यात आला आहे की, पूर्ण निर्धारण आणि उक्ते भाडे यातील तफावतीचा स्वत:साठी विनियोजन करण्याचा इनामदाराचा अधिकार कलम ४ आणि ५ नष्ट करते आणि ही राज्यघटनेच्या अनुच्छेद ३१-क च्या अर्थांतर्गत संपदा नाही. प्रस्तुत प्रयोजनांसाठी अनुच्छेद ३१-क मधील संबंधित तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-

"३१ - क (१) अनुच्छेद १३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, -

(क) कोणत्याही संपदेचे किंवा तिच्यातील कोणत्याही हक्कांचे, राज्याने संपादन करणे अथवा असे कोणतेही हक्क नष्ट करणे अथवा त्यांच्यात फेरबदल करणे, किंवा

(ख) ...........................................................................................

(ग) ...........................................................................................

(घ) ...........................................................................................

(ङ) ...........................................................................................

अनुच्छेद १४, अनुच्छेद १९ किंवा अनुच्छेद ३१ द्वारे प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणत्याही हक्कासही विसंगत आहे, अथवा त्या कायद्यामुळे असा हक्क हिरावला जातो किंवा त्या

हक्काचा संकोच होतो या कारणावरून तो शून्यवत असल्याचे मानले जाणार नाही ;

परंतु ..........................................................................

(२) या अनुच्छेदात, ---------

(क) कोणत्याही स्थानिक क्षेत्रामध्ये अंमलात असलेल्या जमीन धारणा पद्धतीशी संबंधित अशा विद्यमान कायद्यात 'संपदा' हा शब्दप्रयोग किंवा त्याचा स्थानिक समानार्थी शब्द याला जो अर्थ असेल तोच अर्थ, त्या क्षेत्राच्या संबंधात त्या शब्दप्रयोगास असेल आणि त्यामध्ये कोणतीही जहागीर, इनाम अथवा मुआफी किंवा यासारखी अन्य देणगी आणि मद्रास व केरळ या राज्यांमध्ये कोणताही जन्मम हक्क यांचा समावेश असेल ;

(ख) संपदेच्या संबंधातील "हक्क" या शब्दप्रयोगात स्वामी, उपस्वामी, अवरस्वामी, भूधृतिधारक, रयत, अवरयत किंवा अन्य मध्यस्थ यांच्याकडे निहित असलेले कोणतेही हक्क किंवा विशेषाधिकार यांचा समावेश असेल."

अनुच्छेद ३१- क (२) (क) मधील "संपदा" या शब्दाच्या व्याख्येवरून हे स्पष्ट होईल की, त्यात विनिर्दिष्टरीत्या "इनाम" समाविष्ट आहे. त्यामुळे कलम ३१-क च्या प्रयोजनासाठी "संपदा" या शब्दाच्या अर्थातर्गत इनाम हे संपदा नाहीत असा युक्तिवाद करणे आमच्या मते निरर्थक ठरेल. हा कायदा विशेषत: इनामशी संबंधित आहे आणि अशा प्रकारे, अनुच्छेद १४, अनुच्छेद १९ किंवा अनुच्छेद ३१ नुसार कोणत्याही

हल्ल्यापासून अर्थातच अनुच्छेद ३१-क अंतर्गत संरक्षित असेल. परंतु अशी विनंती करण्यात आली आहे की, इनामदाराने शासनाला उक्ते भाडे भरल्यानंतर पूर्ण निर्धारणाचा जो भाग शिल्लक राहिला तो स्वतःसाठी विनियोजन करण्याचा त्याचा अधिकार हा संपदेतील अधिकार नाही. या युक्तिवादालाही कोणतेही बळ नाही. इनाम हे संपदा असल्यामुळे शासनाला देय असलेल्या उक्ते भाड्याव्यतिरिक्त संपूर्ण निर्धारणाचा काही भाग राखून ठेवण्याचा अधिकार इनामदाराकडे येतो, कारण त्याच्याकडे इनाम-संपदा आहे. त्यामुळे हा हक्क संपदेमधील हक्कापेक्षा अधिक काही असू शकत नाही. शिवाय, अनुच्छेद ३१-क (२) (ख) मधील "हक्क" या अभिव्यक्तीची व्याख्या सर्व स्थिती संशयापलीकडे स्पष्ट करते, कारण त्यात अशी तरतूद आहे की संपदेच्या संबंधातील अधिकारांमध्ये जमीन महसुलाच्या संदर्भातील कोणतेही अधिकार किंवा विशेषाधिकार समाविष्ट असतील. पूर्ण निर्धारण आणि उक्ते भाडे यांतील फरकाचे इनामदाराने स्वतःसाठी विनियोजन करण्याचा त्याचा अधिकार हा संपदेतील अधिकार नव्हता असे जरी म्हणणे शक्य होते तरी,या सर्वसमावेशक व्याख्येमुळे तो संपदेतील हक्क बनेल कारण इनामदाराचा हक्क केवळ जमीन-महसुलाच्या संदर्भात हक्क किंवा विशेषाधिकार असू शकतो. शिवाय, ही बाब स्पष्ट आहे की, प्रश्नांकित हक्क हा संहितेच्या कलम ३ (५) च्या कक्षेत येतो आणि अशा प्रकारे सुद्धा तो अनुच्छेद ३१-क अंतर्गत संपदा आहे. त्यामुळे कायद्याने हाताळलेली इनामे अनुच्छेद ३१-क मधील 'संपदे' मध्ये समाविष्ट होत नाहीत, हा अपीलकर्त्यांचा युक्तिवाद फोल ठरतो. पूर्ण निर्धारण आणि

उक्ते भाडे यांमधील फरक राखून ठेवण्याचा त्यांचा अधिकार हा संपदेमधील अधिकार नाही, हा त्यांचा पुढील युक्तिवादही फोल ठरतो. म्हणून हा कायदा जेव्हा इनामदारांचे इनाम संपदेमधील अधिकार संपुष्टात आणतो किंवा त्यात बदल करतो, तेव्हा तो अनुच्छेद ३१ द्वारे स्पष्टपणे संरक्षित आहे.

पुढचा युक्तिवाद असा आहे की, या कायद्यात नुकसान भरपाईची तरतूद नाही आणि त्यामुळे अनुच्छेद ३१ च्या दृष्टीने तो अधिकारबाह्य आहे. मात्र, आम्हाला असे आढळते की, जेथे कलम ७ अन्वये राज्याला निहित करण्यात आलेल्या इनाम जमिनींच्या भागाचा संबंध आहे, त्या भागाकरिता कलम १० अन्वये कायद्यामध्ये नुकसान भरपाईची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, जेथे कलम ७ अन्वये काहीही शिल्लक राहिले आहे, अशा संभाव्य प्रकरणासाठी कलम १७ मध्ये नुकसानभरपाईची तरतूद करण्यात आली आहे. हे खरे आहे की, उक्ते भाडे आणि पूर्ण निर्धारण यांतील फरकामुळे इनामदारास जे मिळत असे, त्याच्या नुकसानीबद्दल त्याला कलम १७ च्या पोट-कलम (५) नुसार कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही. परंतु, हे स्पष्ट आहे की, अनुच्छेद ३१-क हे अनुच्छेद ३१, जे नुकसानभरपाईबाबत तरतूद केलेले एकमेव अनुच्छेद आहे, त्याच्या कोणत्याही हल्ल्यापासून अधिनियमाचा बचाव करते. प्रकरणाच्या या दृष्टीकोनातून, अधिनियमात काही विशिष्ट अधिकार नष्ट केल्याबद्दल कोणत्याही नुकसानभरपाईची तरतूद करण्यात आली नाही, या कारणास्तव

अधिनियमाच्या  घटनात्मकतेला धक्का लावता येणार नाही.

या अपीलांमध्ये  कोणतेही बळ  नाही आणि ती खर्चासह फेटाळण्यात येत आहेत. केवळ सुनावणीच्या खर्चाचा एक संच.

अपीले फेटाळली.

x-x-x-x

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x